ePaper
“ही देशाच्या राजकारणातील सर्वात मोठी चूक : संजय राऊत



|वर्ष - 6 |अंक - 207 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- सहकार भारती पुरस्कृत पॅनलचे बारा उमेदवार बिनविरोध
- ‘आरटीओ’ ला सुधारित आकृतीबंधाची प्रतिक्षा!
- प्रवाशांच्या सुरक्षेचे काय?


www.mahaenews.com |गुरुवार|दिनांक 10 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# दहा अधिकाऱ्यांचा सन्मान!

## मिळकतकराची वसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांचा आयुक्तांच्या हस्ते रोख रक्कम, ट्रॉफी देऊन गौरव

|पिंपरी-चिंचवड |
|महाईन्यूज |प्रतिनिधी|

**महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने कर वसुलीसाठी शहरात जोरदार मोहिम सुरू आहे. असे असताना 2021-22 या आर्थिक वर्षांत कर वसुल करण्यात महत्वाचा आणि मोलाचा वाटा उलचणाऱ्या 10 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते रोख रक्कम, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.**



> गतवर्षी कर संकलन विभागाने 600 कोटींचे उद्दिष्ट ठेवले होते ते पूर्ण करण्यासाठी शेवटच्या दोन महिन्यात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली. यावर्षी विभागाने 1 हजार कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. यावर्षीही पुन्हा बक्षीस योजना राबवली जाणार आहे.
>
> – **निलेश देशमुख,** सहाय्यक आयुक्त

महापालिकेत बुधवारी (दि.9) रोजी स्थायी समितीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर आयुक्तांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान केला. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त निलेश देशमुख यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते.

गतवर्षी महापालिकेच्या कर संकलन विभागाने तब्बल 600 कोटी रुपयांचा कर वसूल केला. या वसुलीसाठी कर संकलन विभागील कर्मचाऱ्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. 2022-23 या चालू आर्थिक वर्षांसाठी कर संकलन विभागाने 1 हजार कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे.

त्यासाठी सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. शहरातील मालमत्तांकडून कर आकारणी व करसंकलन विभाग करवसुल करतो. त्यासाठी मुख्य कार्यालय व 16 करसंकलन विभागीय कार्यालय आहेत. महापालिकेच्या महसुलात वाढ व्हावी, यासाठी महापालिकेच्या वतीने सातत्याने नवनवीन प्रयोग करण्यात येत आहेत.

विविध सवलतींचे फलक शहरातील मुख्य चौकात उभारणे, खाजगी रेडीओ मार्फत जिंगल्स प्रसिद्ध करणे, थकीत मिळकतधारकाना घरभेटी देणे, जप्तीपूर्व नोटीसा बजाविणे, अंतिमतः जप्ती कार्यवाही करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहे. थकीत मिळकतकराची जास्तीत जास्त वसुली करून पर्यायाने महापालिकेच्या सर्वांगीण विकासकामास हातभार व्हावा यासाठी करसंकलन विभागातील कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर बक्षीस योजना लागू करण्यात आली आहे.

### बक्षीस विजेते अधिकारी सहाय्यक मंडलाधिकारी

दिघी बोपखेल येथील करसंकलन विभागीय कार्यालयाचे सहाय्यक मंडलाधिकारी काळूराम बबले यांना प्रथम क्रमाकांचे 50 हजार रूपये व ट्रॉफी, फुगेवाडी-दापोडी येथील करसंकलन विभागीय कार्यालयाचे मंडलाधिकारी दशरथ कांबळे (द्वितीय क्रमांक-40 हजार आणि ट्रॉफी), थेरगाव येथील करसंकलन विभागीय कार्यालयाचे मंडलाधिकारी राजाराम सरगर (तृतीय क्रमांक -30 हजार आणि ट्रॉफी) यांचा गौरव करण्यात आला आहे. महापालिकेतील कर संकलन कार्यालयाचे गट समन्वयक अरूण जागडे यांना 25 हजार रुपये आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

### गट लिपिक आणि गट प्रमुख

दिघी बोपखेल येथील करसंकलन विभागीय कार्यालयाचे निखिल काळजे ( प्रथम क्रमांक -30 हजार आणि ट्रॉफी), फुगेवाडी दापोडी येथील करसंकलन विभागीय कार्यालयाचे प्रकाश सौदागर (व्दितीय क्रमांक – 25 हजार रुपये आणि ट्रॉफी), महापालिका भवन येथील दत्तात्रय सातव (तृतीय क्रमांक – 20 हजार रुपये आणि ट्रॉफी), भोसरी करसंकलन विभागीय कार्यालयाचे सोमनाथ देवीकर आणि विशाल उगवेकर यांना विभागून चतुर्थ क्रमांक मिळाला आहे. यांना प्रत्येकी 15 हजार रुपये आणि ट्रॉफी देण्यात आली. चिंचवड करसंकलन विभागीय कार्यालयाचे संदीप बेल्हेकर (पाचवा क्रमांक – 10 हजार रुपये आणि ट्रॉफी) यांना गौरविण्यात आले आहे.

# डॉ. दीपक शहा यांना ‘ॲम्बेसडर ऑफ गुडविल ॲवॉर्ड’

## डॉ. प्रेमचंद्र बाफना यांची उपस्थिती : लायन्स क्लबच्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मान

|पिंपरी |
|महाईन्यूज |प्रतिनिधी|

चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटचे संस्थापक सचिव व लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल डॉ. दीपक शहा यांना शैक्षणिक तसेच, ग्रामीण भागातील शाळांना संगणक, गोरगरीब, दारिद्र रेषेखालील नागरिकांना डोळ्यांच्या इस्पितळाची उभारणी, वृद्धाश्रम, मतीमंद मुलांच्या आश्रमांना आर्थिक वस्तूरुपी मदत आदी आरोग्य, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात गेली ३६ वर्षे सातत्याने सक्रीय सहभाग घेत लायन्स क्लबच्या माध्यमातून केलेल्या कार्याची दखल लायन्स क्लब इंटरनॅशनलचे अध्यक्ष ॲलेक्झेन्डर डगलस यांनी घेवून त्याची निवड लायन्स क्लबच्या वतीने देण्यात येणारा सर्वोच्च पुरस्कार ‘ॲम्बेसडर ऑफ गुडविल ॲवॉर्ड’ क्लबचे माजी आंतरराष्ट्रीय संचालक लायन डॉ. प्रेमचंद बाफना यांच्याहस्ते मेडल देवून सन्मानित करण्यात आले.

यावेळी लायन्स क्लबचे माजी मल्टीपल कौन्सिल चेअरमन द्वारका जालन, प्रथम उपप्रांतपाल ला. परमानंद शर्मा, द्वितीय उपप्रांतपाल सुनिल चेकर, आजी-माजी पदाधिकारी ला. हेमंत



नाईक, ला. रमेश शहा, ला. श्रीकांत सोनी, ला. भारती चव्हाण, ला. शरदचंद्र पाटणकर, ला. सी.डी. शेठ, ला.डॉ. अनिल तोष्णीवाल, ला. चंद्रा शेट्टी, लायन्स क्लब ऑफ तळेगावचे अध्यक्ष ला. मयूर राजगुरव, महिला अध्यक्षा ला. राजश्री शहा, प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटच्या अध्यक्षा प्रतिभा शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, एम.बी.ए. चे संचालक डॉ. सचिन बोरगावे, मुख्य प्रशासकिय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, उपप्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, डॉ. वनिता कुऱ्हाडे, डॉ. सुवर्णा गायकवाड, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका सविता ट्रॅवीस समवेत पुणे जिल्ह्यातील लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य महाविद्यालाचे प्राध्यापक, शिक्षक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ. दीपक शहा म्हणाले, आज माझ्या वाढदिवसाचे औचित्य साधून लायन्स क्लब व महाविद्यालयातील गुरूजनांचे मान सन्मानाचे मी आभार मानतो. क्षेत्र कोणतेही असो छोट्या छोट्या गोष्टीतूनच माणूस घडत असतो.

### डॉ. शहा यांची अभिमानास्पद कामगिरी

**प्रमुख पाहुणे डॉ. प्रेमचंद बाफना आपल्या मनोगतामध्ये पुढे म्हणाले, डॉ. दीपक शहा यांनी आपला व्यवसाय सांभाळून लायन्स क्लबच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात गरजू, वंचित, निराधार उपेक्षित, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध स्तरावर भरीव कामगिरी मानवतेच्या भूमिकेतून गेली 36 वर्षे अविरत करीत आहे. सन २००६ साली चिंचवड येथे प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटची स्थापना करून अत्यंत अल्पावधीतच गुणवत्तापूर्वक शिक्षण विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाद्वारे देत आहे. आज ७५०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहे ही, अभिमानास्पद कामगिरी ते पार पाडीत आहे.**

# सहकार भारती पुरस्कृत पॅनलचे 12 उमेदवार बिनविरोध!

## महाराष्ट्र नागरी सहकारी बँक फेडरेशन निवडणूक

।पुणे। महाईन्यूज।

**दि महाराष्ट्र नागरी सहकारी बँक फेडरेशनच्या पंचवार्षिक निवडणुकीत चुरशीची लढत होणार असून फेडरेशनच्या २१ जागांवर सहकार भारतीने सहकार पॅनेलच्या माध्यमातून उमेदवार उभे केले आहेत.**

या निवडणुकीत सहकार भारती पुरस्कृत सहकार पॅनेलचे बारा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. फेडरेशनच्या २१ जागांसाठी एकूण ६१ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यानंतर काही उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने सहकार भारती पुरस्कृत सहकार पॅनेलचे बारा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित नऊ जागांसाठी १२ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. महाराष्ट्र नागरी सहकारी बँक फेडरेशन राज्यातील सर्व नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधित्व करणारी शिखर संस्था आहे. महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींना मतदानाचा हक्क आहे.

निवडणुकीमध्ये महाराष्ट्र नागरी सहकारी बँक फेडरेशनचे विद्यमान अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, विधान परिषदेचे गटनेता प्रवीण दरेकर, अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष संदीप घनदाट यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

सहकार भारतीच्या वतीने कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक किशोर रांगणेकर, अपना सहकारी बँक, मुंबईचे संचालक दत्ताराम चाळके, एनकेजीबीएसबी बँकेचे संचालक संदीप प्रभू, ठाणे भारत को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष उत्तम जोशी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महिला गटामध्ये सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा आणि नाशिक जिल्हा महिला देशात सर्वात जास्त नागरी सहकारी बँका राज्यात आहेत.

सहकारी बँकांना नवी उभारी देण्यासाठी तसेच समस्यांचे निराकरण करण्यासाठी सहकार भारतीने निवडणुकीत विजयाचा संकल्प केला आहे, असे सहकार भारतीचे महाराष्ट्र महामंत्री विवेक जुगादे यांनी सांगितले.




# महिनाभर तीनही ऋतूंच्या अनुभूतीची शक्यता; नोव्हेंबरमध्ये हवामानाचे हेलकावे

पुणे । महाईन्यूज ।

राज्यातील वातावरणाची स्थिती पाहता नोव्हेंबरअखेपर्यंत यंदाही हवामानाचे हेलकावे अनुभवण्यास मिळणार आहेत. नोव्हेंबरच्या सुरुवातीस असलेली थंडी आता कमी होऊ लागली असून, अनेक भागांत अंशत: ढगाळ वातावरण तयार झाले आहे. त्यातच चार ते पाच दिवसांत दक्षिण कोकणात तुरळ ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. या महिन्यात पुढील काळात वातावरणाच्या स्थितीत सातत्याने बदल होणार असल्याने



ऊन, थंडी आणि पाऊस आदी तीनही ऋतूंची अनुभूती मिळण्याची शक्यता आहे.

राज्यात ऑक्टोबरच्या अखेरच्या आठवड्यात किमान तापमानात झपाट्याने घट होऊन गारवा निर्माण झाला. नोव्हेंबरच्या सुरुवातीलाही राज्याच्या बहुतांश भागांतील तापमानात घट होऊन थंडी अवतरली. या काळामध्ये राज्यात आकाशाची स्थिती निरभ्र आणि कोरड्या हवामानाची निर्माण झाल्याने

### दक्षिणेकडे वारे सक्रिय

सर्वाधिक कमाल तापमान रत्नागिरी येथे ३५.२ अंश नोंदविले गेले. पुढील चार ते पाच दिवसांत दक्षिण कोकणात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. उर्वरित महाराष्ट्रात मात्र या कालावधीत कुठेही पाऊस होणार नाही. ऑक्टोबरच्या शेवटी पावसाळी वातावरण दूर होऊन निरभ्र आकाश झाल्याने गारवा निर्माण झाला. नोव्हेंबरच्या सुरुवातीला कोरड्या स्थितीमुळे सर्वत्र थंडी अवतरली. यंदा नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांना परतण्यास उशीर झाला आणि ईशान्य मोसमी वारे दक्षिणेकडे सक्रिय होण्यासही विलंब झाला. सध्या दक्षिणेकडे हे वारे सक्रिय आहेत.

प्रामुख्याने किनारपट्टीच्या भागात कोकण विभागामध्ये आणि विदर्भात काही भागांत दिवसाच्या कमाल तापमानात वाढ होऊन उन्हाचा चटका वाढला. याच कालावधीत मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात बहुतांश भागात तापमानाचा पारा घसरला होता. औरंगाबाद, पुणे, नगर, नाशिक, जळगाव आदी भागांत नीचांकी तापमानाची नोंद झाली. बुधवारपासून राज्यातील वातावरणात पुन्हा बदल सुरू झाला आहे. राज्याच्या बहुतांश भागात आता अंशत: ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे दिवसाचे तापमान सरासरीच्या जवळपास आले आहे. काही भागांत रात्रीही अंशत: ढगाळ वातावरण निर्माण होत असल्याने रात्रीच्या किमान तापमानात वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात १२ ते १४ अंश सेल्सिअसवर असलेले मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातील तापमान आता १४ ते १७ अंशांवर गेले आहे.

# ज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी देशाला महासत्ता घडवावे

## इस्रोचे प्रमुख डॉ. सोमनाथ एस. यांचे मत

पुणे । महाईन्यूज ।

**ज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी देशाला महासत्ता घडवावे; विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यातील यश वैयक्तिक आणि व्यावसायिक अशा अनेक गुणांवर अवलंबून असते. विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा वापर करून नवीन मार्ग दाखवत देशाला जगात महासत्ता म्हणून घडवावे, असे मत भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) प्रमुख डॉ. सोमनाथ एस यांनी व्यक्त केले.**



एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या पाचव्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. इंडियन केमिकल सोसायटीचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आणि कुलगुरू डॉ. मंगेश कराड, प्र-कुलगुरू डॉ. अनंत चक्रदेव, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात सामा टेक्नॉलॉजीज यूएसएचे संस्थापक सुरेश कट्टा यांना मानद डॉक्टरेट, डॉ. गणपती यादव भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम विज्ञान आणि तंत्रज्ञान पुरस्काराने गौरवण्यात आले.

विद्यापीठातर्फे २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील १६ विद्याशाखेतील २ हजार ३१५ विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तर ४५ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

डॉ. सोमनाथ म्हणाले, की सर्वांगिण शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना ध्येयप्राप्तीसाठी महत्वाची ठरेल. आजचे आधुनिक शिक्षण हे बदलणाऱ्या जगात ठामपणे उभे राहण्यास मदत करेल. समाजाच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी, देशाला सक्षम करण्यासाठी अवकाश तंत्रज्ञानाच्या वापरावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

# ‘आरटीओ’ला सुधारित आकृतीबंधाची प्रतिक्षा!

## दीपक मोढवे-पाटील यांची मागणी : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुधारित आकृतीबंध आणि ‘आरटीओ’चा दर्जा देण्याबाबत मंजूर झालेल्या प्रस्तावाची तात्काळ अंमलबजाणी करावी, अशी मागणी भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.**

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री तथा परिवहन मंत्री एकनाथ शिंदे यांना लेखी निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, राज्यातील ‘आरटीओ’ व ‘डेप्युटी आरटीओ’ कार्यालयांचे नियंत्रण मुंबईतील परिवहन आयुक्तालयाकडून केले जाते. या विभागात मनुष्यबळाचा असमतोल आहे. गरजेची पदे कमी व काही पदे अनावश्यक वाढल्याचे निदर्शनास आल्याने मनुष्यबळाचा सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आला आहे. मात्र, या आकृतीबंधाची अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

तसेच, राज्यात १५ प्रादेशिक परिवहन कार्यालये आहेत. त्यात आता आणखी नऊची भर पडणार आहे. पिंपरी-चिंचवड, जळगाव, सोलापूर, अहमदनगर, पालघर, चंद्रपूर, अकोला, बोरिवली व सातारा या ‘डेप्युटी आरटीओ’ कार्यालयांचा दर्जा वाढवून त्यांना आता ‘आरटीओ’चा दर्जा देण्याचे प्रस्तावित आहे.




विविध वाहनांचे पासिंग, ओव्हरलोड वाहतूक रोखणे, महामार्गावरील वाहतुकीला शिस्त लावणे आदी प्रमुख जबाबदारी असलेल्या प्रादेशिक परिवहन खात्यात मनुष्यबळाचा सुधारित आकृतिबंध सादर करण्यात आला आहे. त्याचवेळी ‘डेप्युटी आरटीओ’ची नऊ कार्यालये अपग्रेड करण्याचे नियोजन आहे. त्यादृष्टीने कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

परिवहन विभागात राज्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांची मिळून एकूण ४ हजार २३५ पदे मंजूर आहेत. परंतु, नव्या आकृतिबंधात ही संख्या ३ हजार ८२३ वर आणण्यात आली आहे. त्यात ४१२ ने घट झाली आहे.

सहपरिवहन आयुक्तांची पाच, आरटीओची १२, तर सहायक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची तब्बल ७४ पदे वाढली आहेत, अशी माहिती दीपक मोढवे-पाटील यांनी दिली.



“ पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामाचा वाढता व्याप आणि वाहणांची संख्या पाहता प्रादेशिक कार्यालय म्हणून अपग्रेड करण्याची आवश्यकता आहे. याबाबत प्रस्ताव शासनदरबारी प्रलंबित असून, त्यावर तात्काळ कार्यवाही व्हावी. तसेच, नव्या आकृतीबंधानुसार पुरेशे मनुष्यबळ उपलब्ध करुन पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील वाहनचालक, नागरिकांना दिलासा द्यावा, अशी आमची मागणी आहे. मुख्यमंत्री याबाबत सकारात्मक निर्णय घेतील, असा विश्वास आहे.

**- दीपक मोढवे-पाटील,** शहराध्यक्ष, भाजपा वाहतूक आघाडी, पिंपरी-चिंचवड.


---

# विद्यार्थी बक्षीस योजनेस मुदतवाढ!

## समाज कल्याण विभागाचा निर्णय : विद्यार्थी-पालकांना दिलासा

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाकडील इतर कल्याणकारी योजने अंतर्गत दहावी आणि बारावीच्या 80 टक्क्यांपेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना बक्षिस रक्कम देण्याच्या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. एकही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये यासाठी 30 नोव्हेंबर 2022 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.**



### शत्रुघ्न काटे यांच्या पाठपुराव्याला यश



**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिष्यवृत्ती योजनेत आता सीबीएसई बोर्ड, आसीएसई बोर्डच्या विद्यार्थ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा केला होता. महापालिका प्रशासनाने नुकताच या योजनेत बदल केला असून अखेर शत्रुघ्न काटे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.**

महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत विविध प्रकारच्या लोक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये इतर कल्याणकारी योजने अंतर्गत दहावी मध्ये 80% ते 90% व 90% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या महाराष्ट्र राज्य मंडळ (SSC BOARD) अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील व शिक्षण हक्क कायदा (RIGHT TO EDUCATION ACT) अंतर्गत शाळांमधील विद्यार्थी / विद्यार्थीनींना बक्षीस रक्कम देणे. बारावी मध्ये 90% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या महाराष्ट्र राज्य मंडळ (HSC BOARD) अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनींना बक्षीस रक्कम देणे, या योजनेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची मुदत 31 ऑक्टोबर 2022 पर्यंत होती. त्याची मुदत वाढविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना 30 नोव्हेंबर 2022 पर्यंत अर्ज करता येतील.

विद्यार्थी अणि पालकांच्या मागणीनुसार योजने मध्ये सुधारीत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार CBSC BOARD,ICSC BOARD अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील / महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थीनींना देखील या योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेच्या नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार आवश्यक ती कागदपत्रे महापालिकेच्या वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज अर्जदार व्यक्ती, मोबाईल, लॅपटॉप, संगणक किंवा नागरी सुविधा केंद्रांमार्फत विहीत शुल्क भरुन देखील भरता येतील, असे उपआयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी सांगितले.

---

# मेट्रोच्या प्रवासाचे तिकीट आता व्हॉट्सॲपवर मिळणार

## आता वेळेची होणार बचत, मेट्रोच्यावतीने माहिती

**।पिंपरी ।महाईन्यूज ।**

मेट्रोने प्रवाशांच्या सोयीसाठी तिकीट व्हॉट्स ॲपवर उपलब्ध करून दिले आहे. नागरिकांचा व्हॉट्स ॲपचा वाढता वापर पाहून हा निर्णय घेण्यात आला आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना तिकिटासाठी रांगेत उभी राहावे लागणार नाही. तसेच वेळेची देखील बचत होणार असल्याची माहिती मेट्रोच्या वतीने देण्यात आली आहे.

पुणे मेट्रोने ९४२०१०१९९० हा व्हॉट्स ॲप क्रमांक सुरू केला असून प्रवाशांनी आपल्या मोबाइलमध्ये हा नंबर सेव्ह करून ठेवण्याचे आवाहन मेट्रोने केले आहे. प्रवासी पुणे मेट्रोच्या या फोन नंबर वर हाय मेसेज पाठवून चॅटबॉटशी संवाद साधण्यासाठी किंवा कोणत्याही मेट्रो स्टेशनवर उपलब्ध क्युआर कोड स्कॅन करून व्हॉट्सॲप चॅट सुरू करू शकतात.

सध्या व्हॉट्सॲपद्वारे क्युआर कोड ई-तिकीट टॉम काउंटर आणि डिजिटल किओस्क मशीनद्वारे वितरित केले जाते. लवकरच प्रवासी व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे



तिकिटे बुक करू शकतील आणि व्हॉट्स ॲप वापरकर्ते त्यांच्या तिकिटांसाठी पेमेंट करू शकतील. व्हॉट्स ॲपवर त्यांचा प्रवास तपशील निवडल्यानंतर एकात्मिक पेमेंट पार्टनरद्वारे रिचार्ज करू शकतील. ही सुविधा मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये उपलब्ध असणार, अशी माहिती मेट्रोने सांगितले. या बाबत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित म्हणाले की, पुणे मेट्रोच्या नवीन व्हॉट्स ॲप चॅटबॉट सुविधेमुळे प्रवाशांना सुलभ आणि त्रासमुक्त प्रवास उपलब्ध होणार आहे. ही नवीन तिकीट प्रणाली नागरिकांचा वेळ वाचवण्यासाठी खूप मदत करेल आणि हे एक पर्यावरणास अनुकूल पेपरलेस तिकीट आहे.

## संपादकीय »

# भारत जोडो यात्रेने पक्षतरी जुळेल काय ?

***गेली दोन महिने कॉँग्रेस नेते राहुल गांधी दररोज सरासरी २५ किलोमीटर पदयात्रा करीत भारत भ्रमण करीत आहेत. त्यांचे आडनाव पणजोबा महात्मा गांधी नेहमी म्हणत असत की ज्याला भारताचे राजकारण करायचे आहे त्याने अवघा देश पालथी घातला पाहिजे.***

हा विशाल देश, तिथले प्रांत, भाषा, संस्कृती, बोली,भाषा आणि निसर्ग समजून घेतल्याशिवाय तुम्हाला भारताशी समरस होताच येणार नाही. महात्मा गांधींचा सहवास ज्यांना लाभला त्या इंदिरा गांधींनी आपल्या कार्यकाळात गांधींचा उपदेश पाळला. देशातील एकही प्रांत त्यांनी असा ठेवला नाही जिथे त्या गेल्या नाहीत. देश पालथा घालण्याचे काम इंदिराजींनी केले म्हणूनच कदाचित त्यांच्या एवढा भारत आजवर कुणालाही कळला नसावा. त्यांच्या तिसऱ्या पिढीच्या या भारत भ्रमणाचे गुपित कदाचित लक्षात आले असावे. भ्रमण, पर्यटन किंवा तीर्थाटन नाव काहीही दिले तरी सतत फिरणे हा भाग कायम असतो. घराबाहेर पडल्यावरच देश , समाज कळायला लागतो आणि एकदा का तो समजला की त्याचे नेमके प्रश्न कळतात आणि प्रश्न कळला की त्याची सोडवणूक करणे सोपे जाते हे साधे गणित आहे मात्र आयुष्य खपून जातात पण लोक घराबाहेर पडत नाहीत आणि मग आपले नेमके कुठे गणित चुकले याची गणित करीत बसतात. जुनी माणसं आजही सांगत असतात की देशाटन करणारा हुशार असतो. त्याला इतरांच्या तुलनेत जास्त अक्कल असते. त्याचे कारण त्यांचे शिक्षण नसते ,पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभव आणि लोकांना सतत वाचत मिळवलेले ज्ञान अधिक भारी असते. फिरणाऱ्या व्यक्तीला दररोज शेकड्यानी लोकांचे चेहरे वाचण्याची संधी उपलब्ध होते. आपण घरकोंबडे कंटाळून जाईपर्यंत तेच ते चेहरे बघत असतो.

राहुल गांधी यांच्या पदयात्रेला दोन महिने झाल्यावर ती दखलपात्र झाली आहे. यातला मिळणार प्रतिसाद आणि राहुल गांधी यांचे सामान्य जनात मिसळून खरा भारत समजून घेण्याची आस पाहता त्याची दखल घेणे गोदी मीडियाची मजबुरी बनली आहे. मीडियाचा मुखवटा लावलेल्या एका फॅसिष्ट विचारधारेने त्याला पप्पू ठरवले , तो जणू काहीच कामाचा उरला नाही असे चित्र उभे केले. तो कर्तव्यापासून पळणारा चैनी युवक असल्याची मांडणी करू झाली , काहींनी हेच सत्य असावे हे गृहीत धरून बोलायला पण सुरुवात केली परंतु भारत जोडो यात्रेने गैरसमजाचे मुखवटे गाळून पडायला लागले. लोक राजकारण सोडून त्याच्या पैदल चालण्याचे आणि अदम्य साहसाचे कौतुक करायला लागले, त्याची एक झलक बघायला का होईना रस्त्यावर गर्दी करायला लागले हा बदल अनेकांच्या झोपा उडवायला लागला हे कबुल केले पाहिजे.



## आनंदी सकाळ

# ज्ञानी विवेकजनित आणि विज्ञानयुक्त महात्मा

माळरानावर सूर्य किरणांमुळे पाण्याचा भास होतो व ते खरे आहे, असे समजून हरीण त्या पाण्याच्या मागे धावते. पण त्याला पाणी तर मिळत नाही, उलट अतिश्रमाने त्याचा मृत्यू होतो. अशीच अवस्था माणसाची होते. मृगजळासम असलेल्या या संसाराला तो सत्य मानतो. एकीकडे त्याला मुक्तीची इच्छा आहे. 'मी'ची अंधुक, अज्ञानवश का होईना, पण जाणीव आहे आणि दुसऱ्या बाजूला 'मी' काय आहे हे नेमके कळत नाही. आपल्याभोवती वावरणाऱ्या लोकांमध्ये काही अज्ञानी, काही मुमुक्षू व काही ज्ञानी जीव आहेत. अज्ञानी जीव देहालाच सत्य समजतात. 'देहोऽहं' देह असे ते समजतात. याच लोकांची संख्या जास्त असते. त्यांना मोक्षाची इच्छाच उत्पन्न होत नाही. हे अज्ञानीबद्ध जीव असतात. इतर जिवांना मी मुक्त झालो पाहिजे ही तळमळ लागते.

# प्रवाशांच्या सुरक्षेचे काय?






गेल्या आठवड्यात पुण्याहून ये-जा करणाऱ्या दोन 'शिवशाही' बसने अचानक पेट घेतला. संबंधित बसमधील चालक-वाहकांनी प्रसंगावधान दाखविल्याने सर्व प्रवासी सुखरूप बाहेर पडले असले, तरी 'शिवशाही' बसबाबत या घटना पहिल्यांदाच घडलेल्या नाहीत. यापूर्वी राज्याच्या अनेक भागांमध्ये 'शिवशाही' बसने पेट घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये अद्याप कोणतीही जीवितहानी झाली नाही, हे एसटी महामंडळाचे सुदैव असले, तरी दरवेळीच पारडे त्यांच्या बाजूने राहील याची शाश्वती नाही. भविष्यातील कोणतीही कटू घटना घडण्यापूर्वीच खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने एसटी महामंडळ आणि राज्य सरकारने प्रयत्न करण्याची गरज असून, तसे सध्या तरी होताना दिसत नाही. गेल्या वर्षी ऐन दिवाळीत एसटीच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारला. एसटीत आजवर सर्वाधिक काळ चाललेल्या या संपाने कर्मचाऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्या मागच्या राजकारणात सध्या जाण्याची गरज नाही; मात्र राज्याच्या कानाकोपऱ्यातील कोणत्याही भागात हक्काने पोहोचणाऱ्या एसटीच्या प्रवाशांना माफक दरात वातानुकूलित प्रवास करता यावा, या हेतूने भारतीय जनता पक्ष-शिवसेना युतीच्या सरकारच्या काळात 'शिवशाही' बस सर्वप्रथम मार्गावर धावली. सुरुवातीच्या काळात बहुतांश बस ठेकेदारांच्या होत्या. त्या वेळी अनेक 'शिवशाही' बसला अपघात झाले. त्यात काही प्रवाशांचा जीव गेला. त्यानंतर एसटीने केवळ ठेकेदारांवर अवलंबून राहण्याऐवजी, स्वत:च्या ताफ्यातील 'शिवशाही' बसची संख्या वाढविण्याकडे लक्ष दिले. आजमितीस राज्यभरात एसटीच्या दीड हजारांहून अधिक 'शिवशाही' धावतात. त्यापैकी पाचशे बस ठेकेदारांच्या आहेत. किमान दोनशे ते कमाल चारशे ते साडेचारशे किलोमीटरचे अंतर 'शिवशाही'द्वारे कापले जात असताना, या सर्वच बसच्या देखभालीकडे लक्ष देणे अत्यंत जरूरीचे आहे. दुर्दैवाने, याकडेच पुरेसे लक्ष दिले जात नाही. कोव्हिडचा संसर्ग कमी झाल्यानंतर, यंदाच्या दसरा-दिवाळीमध्ये मोठ्या संख्येने एसटीला प्रवासी लाभले. गेल्या वर्षीच्या संपाचा मोठा फटका बसला असल्याने, यंदा कोणतीही बस रद्द होणार नाही, जादा बस उपलब्ध असतील याकडे लक्ष दिले गेले असले, तरी या सर्व बस प्रवाशांसाठी सुरक्षित आहेत का? या बसमधील वातानुकूलित यंत्रणा व्यवस्थित चालते का? ती चालत नसल्यास त्यातील अडचणी कधी दूर केल्या गेल्या? चालक-वाहकांनी दाखवून दिलेल्या कमतरतांकडे वेळेत लक्ष दिले गेले का, या सगळ्याचा नियमित आढावा घेण्याची गरज आहे. तसे

# धक्काशोषक पुलामध्ये हवेत, समाजात नकोत...

**धक्काशोषक तंत्र वापरल्यास पूल मजबूत होतो. मात्र समाजातील सहनशीलता धक्काशोषकाप्रमाणे वापरली गेल्यास समाज कमकुवत होतो. राजकीय नेत्यांसाठी ते सोयीचेच असते...**



लंडनच्या थेम्स नदीवर बांधलेला नवाकोरा मिलेनियम ब्रिज १० जून २००० रोजी नागरिकांसाठी खुला झाला. नव्या सहस्रकाला साजेसा असा हा प्रशस्त, सडपातळ, चकचकीत देखणा, धातूचा पादचारी पूल लंडनचे एक मोठे आकर्षण होता. अरूप (अभियांत्रिकी सल्लागार), नॉर्मन फॉस्टर (विख्यात वास्तुरचनाकार) आणि सर अँथनी कारो (शिल्पकार) अशा तीन सल्लागार कंपन्यांनी पुलाच्या डिझाइन आणि उभारणीची स्पर्धा जिंकली होती. त्यांनी मेहनत घेऊन पुलाचे नावीन्यपूर्ण डिझाइन केले होते. उद्घाटन झाले. आधीच पुलाला प्रसिद्धी मिळाली होती. त्यामुळे पहिल्याच दिवशी एक लाख लोकांनी पुलावर गर्दी केली. गर्दी होताच पूल डावी-उजवीकडे झोकांड्या खाऊ लागला. चालणाऱ्या लोकांना खूपच मजा वाटू लागली. त्यामुळे अधिक लोकांनी त्या जागी गर्दी केली. पुलाचे विब्ली वोब्ली पूल असे बारसेही करून टाकले!झोकांड्या खाणाऱ्या गर्दीचे आणि पुलाचे चित्रीकरण झाले नसते तरच नवल. सर्व माध्यमांमध्ये त्याची छायाचित्रे झळकू लागली. मात्र पुलाच्या रचनाकारांचे आणि अभियंत्यांचे धाबे दणाणले. संभाव्य धोक्यामुळे दोन दिवसांनीच पुलावर प्रवेश बंद करण्याची नामुष्की ओढवली. तोपर्यंत 'विब्ली वोब्ली लंडन पूल' जगप्रसिद्ध झाला होता. अभियंते या भुताटकीने चक्रावून गेले! अर्थात भुताटकी कधीच खरी नसते; त्यामुळे पुलाच्या रचनेची, या चमत्कारिक झोकांड्यांची वैज्ञानिक पद्धतीने बारकाईने चिकित्सा सुरू झाली.

लोखंडी केबलच्या पुलांचे बांधकाम तंत्र अभियांत्रिकी क्षेत्रात विकसित होऊन अनेक शतके मुरलेले आहे. मिलिटरी अभियांत्रिकीमध्ये अवजड रणगाडे, ट्रक आणि शिस्तबद्ध, लयीत चालणाऱ्या सैनिकांच्या हालचालींसाठी रुंद, भक्कम पूल कमी वेळात उभारले जातात. पण अशा कोणत्याही उदाहरणामध्ये झोकांड्या खाणाऱ्या पुलांची नोंद झालेली नव्हती. चक्रावलेले अभियांत्रिकी विशेषज्ञ आणि विद्यापीठांमधील संशोधक झपाट्याने कामाला लागले. पुलाच्या प्रत्येक भागाची, प्रत्येक जोडणीची तपासणी झाली.

## ।। अभंगवाणी ।।




एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### सहा महिन्यात गोखले पुलाची एकतरी मार्गिका सुरू करा



।मुंबई । महाईन्यूज ।

सार्वजनिक सुट्टीमुळे गोपाळ कृष्ण गोखले पुल परिसरातील वाहतुक मंगळवारी सुरळीत होती, परंतु या ठिकाणचे वाहतुक नियोजन करण्यासाठी वाहतुक पोलिसांनी विविध उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे. तसेच याबाबत वाहतुक पोलिसांनी महापालिकेला पत्र लिहून विविध मागण्या केल्या आहेत. तसेच पुढील सहा महिन्यात पुलाच्या एका बाजूचे काम करण्याबाबतची विनंती करण्यात आल्याचेही अधिकाऱ्याने सांगितले.

वाहतुक पोलिसही वाहतुक नियमानासाठी विविध उपाययोजना करत आहेत. आम्ही महापालिकेला पुढील सहा महिन्यांत काम पूर्ण करून पुलाची एक बाजू सुरु करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे वाहनचालकांनाही मोठा दिलासा मिळेल, असे वाहतूक पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

# थेट सरपंचपदांसह 7 हजार 751 ग्रामपंचायतींच्या सदस्यपदासाठी 18 डिसेंबरला मतदान!

## राज्य निवडणूक आयुक्तांकडून घोषणा

।मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील विविध जिल्ह्यांतील ७ हजार ७५१ ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १८ डिसेंबर २०२२ रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी संबंधित ठिकाणी आजपासून आचारसंहिता लागू झाली असून २० डिसेंबर २०२२ रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज येथे केली.

मदान यांनी सांगितले की, ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या; तसेच नव्याने स्थापित या सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी संबंधित तहसीलदार निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. नामनिर्देशनपत्र २८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ या कालावधीत दाखल करण्यात येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी ५ डिसेंबर २०२२ रोजी होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ७ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असेल व त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान १८ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत होईल. नक्षलग्रस्त भागात दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. मतमोजणी २० डिसेंबर २०२२ रोजी होईल. विविध जिल्ह्यांत निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची जिल्हा व तालुकानिहाय संख्या-

अहमदनगर- २०३, अकोला- २६६, अमरावती- २५७, औरंगाबाद- २१९, बीड- ७०४, भंडारा- ३६३, बुलडाणा- २७९, चंद्रपूर- ५९, धुळे- १२८, गडचिरोली- २७, गोंदिया- ३४८, हिंगोली- ६२, जळगाव- १४०, जालना- २६६, कोल्हापूर- ४७५, लातूर- ३५१, नागपूर- २३७, नंदुरबार- १२३, उस्मानाबाद- १६६, पालघर- ६३, परभणी- १२८, पुणे- २२१, रायगड- २४०, रत्नागिरी- २२२, सांगली- ४५२, सातारा- ३१९, सिंधुदुर्ग- ३२५, सोलापूर- १८९, ठाणे- ४२, वर्धा- ११३, वाशीम- २८७, यवतमाळ- १००, नांदेड- १८१ व नाशिक- १९६. एकूण- ७५१.



मदान यांनी सांगितले की, ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या; तसेच नव्याने स्थापित या सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी संबंधित तहसीलदार निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. नामनिर्देशनपत्र २८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ या कालावधीत दाखल करण्यात येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी ५ डिसेंबर २०२२ रोजी होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ७ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असेल व त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान १८ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत होईल.

# संजय राऊतांच्या सुटकेचा मार्ग मोकळा

## ईडीची जामीन स्थगितीची मागणी न्यायालयाने फेटाळली

।मुंबई । महाईन्यूज ।

**शिवसेनेचे ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) खासदार संजय राऊत यांना जामीन न्यायालयाने मंजूर केला होता. तब्बल १०० दिवसानंतर संजय राऊत यांना पीएमएल न्यायालयाने दिलासा दिला होता. पण, संजय राऊत यांच्या जामिनाला अंमलबजावणी संचालनालयाने ( ईडी ) न्यायालयात विरोध केला होता. त्यानंतर ईडीला मोठा धक्का बसला आहे. न्यायालयाने ईडीची मागणी फेटाळली आहे.**



न्यायालयाने संजय राऊत आणि त्यांचे सहकारी प्रवीण राऊत यांना जामीन मंजूर केला होता. पण, संजय राऊतांच्या जामिनाला ईडीने विरोध करत दाद मागण्यासाठी वेळ देण्याची मागणी केली होती. 'तपास यंत्रणेला उच्च अथवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे. आम्हाला ठराविक वेळ द्यावा असे नाही. मात्र, आम्हाला उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी आदेशाला स्थगिती द्यावी,' असे ईडीने न्यायालयात म्हटलं होतं. तर, ईडीच्या मागणीचा प्रवीण राऊत यांच्या वतीने विरोध करण्यात आला. "जामीन मिळाला असला तरी आम्ही कुठेही पळून जाणार नाही. तपास यंत्रणेला त्यांचा कायदेशीर मार्ग निवडण्याचा अधिकार आहे. उच्च न्यायालय आजपासून नियमित सुरू झालं आहे. त्यामुळे तिथे ईडीने तिथे दाद मागावी," असं प्रवीण राऊत म्हणाले.

दरम्यान, संजय राऊत यांच्या जामिनाला विरोध करणारी ईडीची मागणी न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे संजय राऊत यांचा तुरुंगातून बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तर, या विरोधात ईडी उच्च न्यायालयात जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# कोलाड मध्ये मुंबई-गोवा महामार्गासाठी मानवी साखळी आंदोलन!

## जिल्ह्यातील साडे तीनशे पत्रकार सहभागी

।अलिबाग । महाईन्यूज ।

मुंबई गोवा महामार्गाच्या पळस्पे ते इंदापूर पट्ट्यातील रुंदीकरणाचे काम गेल्या ११ वर्षांपासून रखडले आहे. देखभाल दुरुस्ती आभावी महामार्गाची सध्या मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली आहे. त्यामुळे वाहनचालक आणि प्रवाश्यांना खड्यांत आदळत आपटत प्रवास करावा लागतो आहे. या प्रश्नाकडे लक्षवेधण्यासाठी रायगड जिल्ह्यातील पत्रकार आणि सामाजिक संघटनांनी कोलाड येथे मानवी साखळी आंदोलन केले.

सकाळी साडेदहा वाजेपासून या आंदोलनाला सनदशीर मार्गाने सुरवात झाली. जिल्ह्यातील साडे तीनशे पत्रकार यात सहभागी झाले होते. विवीध सामाजिक संघटनांनीही या आंदोलनाला पाठींबा दिला. आमदार अनिकेत तटकरे यांनीही आंदोलनाला पाठींबा देत आपला सहभाग नोंदविला. अकरा वाजेपर्यंत रस्त्याच्या कडेला उभे राहून मानवी साखळी करून आंदोलन सुरु होते. यावेळी रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवा आणि कॉंक्रीटीकरणाचे काम सुरवात करा अशी मागणी यावेळी करण्यात आली. यानंतर महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक यशवंत व्होटकर आणि रोहा तहसिलदार कविता जाधव कोलाड नाका येथे दाखल झाले.




त्यांनी आंदोलकांशी चर्चा केली. खड्डे बुजविण्याचे काम पंधरा दिवसात पुर्ण केले जाईल आणि कॉंक्रीटीकरणाचे काम महिन्याभरात सुरु केले जाईल अशी ग्वाही आंदोलन करत्यांना दिली. रस्त्या कामाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी अशी मागणी यावेळी रायगड प्रेस कल्बच्या वतीने करण्यात आली.

तर आमदार अनिकेत तटकरे यांनी भुसंपादनाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले

# नेपाळमध्ये भूकंपाचा धक्का!

## 6 जणांचा मृत्यू; दिल्लीमध्ये हादरे

। नवी दिल्ली
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नेपाळमध्ये बुधवारी पहाटे भूकंपाचा धक्का बसला असून यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आहे. येथील डोटी जिल्ह्यात काही घरेदेखील पडली आहेत. ६.३ रिश्टर स्केलच्या या भूकंपाचे हादरे राजधानी दिल्ली परिक्षेत्रातही बसले आहेत.**



नेपाळमधील डोटी जिल्ह्यामध्ये पहाटेच भूकंप झाल्याची घटना घडली. या भूकंपात आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ५ जण जखमी झाले आहेत. जखमी नागरिकांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून नेपाळच्या लष्कराकडून बचावकार्य केले जात आहे. या भूकंपात अनेक घरेदेखील जमीनदोस्त झाली आहेत. या भूकंपाचे धक्के रात्री २ वाजता राजधानी दिल्ली परिक्षेत्रातही जाणवले. येथे रात्री २ वाजता भूकंपाचे सौम्य धक्के बसले. या भूकंपाची खोली जमिनीपासून १० किमी खाली असल्याची माहीती येथील राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने दिली आहे. या भूकंपामध्ये मृत्यू झालेल्यांची ओखळ अद्याप पटलेली नाही. मात्र मृतांमध्ये एक महिला आणि दोन मुलांचा समावेश आहे. दरम्यान मागील २४ तासांमधील नेपाळमधील हा दुसरा भूकंपाचा धक्का आहे. याआधी मंगळवारी सकाळी ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले होते.

## फरार नीरव मोदीला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा; लंडन कोर्टानं दिले आदेश!



**नवी दिल्ली :** पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणी भारतातून फरार झालेला हिरे व्यापारी नीरव मोदीला पुन्हा भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लंडनमधील उच्च न्यायालयाने बुधवारी यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण निकाल दिला असून त्यानुसार तब्बल १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा करणाऱ्या नीरव मोदीची भारतीय तपास यंत्रणांकडून आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी तास होणार आहे. पीटीआयनं यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.

नीरव मोदीला भारताच्या ताब्यात देण्यात यावं, यासाठी लंडन कोर्टात भारताकडून सातत्याने बाजू मांडली जात होती. याविरोधात नीरव मोदीनं लंडन उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. मात्र, आज या याचिकेच्या सुनावणीदरम्यान लंडन कोर्टानं ही याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे नीरव मोदीच्या मुसक्या आवळून त्याला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. खरंतर फेब्रुवारी महिन्यातच नीरव मोदीला भारताच्या ताब्यात देण्यासंदर्भात वेस्टमिन्स्टर मॅजिस्ट्रेट कोर्टानं

## नितीन गडकरींकडून माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचं जाहीरपणे कौतुक



।नवी दिल्ली।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काँग्रेस नेते आणि माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचं कौतुक केलं आहे. आर्थिक सुधारणांसाठी आपण मनमोहन सिंग यांचे ऋणी असल्याचं नितीन गडकरी यांनी सांगितलं आहे. TIOL पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी नितीन गडकरी यांनी भारताला गरिबांना फायदा देणाऱ्या उदारमतवादी आर्थिक धोरणाची गरज आहे असल्याचं मत मांडलं. "उदारमतवादी आर्थिक धोरणामुळे देशाला नवी दिशा मिळाली. यासाठी देश मनमोहन सिंग यांचा ऋणी आहे," असं सांगत नितीन गडकरी यांनी कौतुक केलं. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक धोरणांमुळेच आपण १९९० दरम्यान महाराष्ट्रात रस्ते निर्माण करताना निधी उभारु शकलो असं यावेळी त्यांनी सांगितलं.(GDP) 85 टक्के, जागतिक व्यापाराच्या 75 टक्क्यांहून अधिक आणि जगाच्या लोकसंख्येच्या सुमारे दोन तृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करते. मंत्रालयाने म्हटले आहे की, G20 परिषदेच्या काळात भारत देशभरातील विविध ठिकाणी 32 विविध क्षेत्रांशी संबंधित सुमारे 200 बैठका आयोजित करेल. पुढील वर्षी होणारी G20 शिखर परिषद ही भारताकडून आयोजित करण्यात येणाऱ्या उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय शिखर परिषदांपैकी एक असेल. भारत सध्या G20 ट्रोइका (वर्तमान, भूतकाळातील आणि आगामी G20 अध्यक्षपदाचा) भाग आहे ज्यात इंडोनेशिया, इटली आणि भारत यांचा समावेश आहे. उदारमतवादी आर्थिक धोरण शेतकरी आणि गरीबांसाठी असल्याचं नितीन गडकरी यावेळी म्हणाले. 'TaxIndiaOnline' या पोर्टलने हा पुरस्कार सोहळा आयोजित केला होता.

नितीन गडकरी यांनी यावेळी चीनचाही उल्लेख केला.

## न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांनी देशाचे ५०वे सरन्यायाधीश म्हणून घेतली शपथ!

।नवी दिल्ली।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

न्यायमूर्ती डी वाय चंद्रचूड यांनी देशाचे ५० वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली आहे. धनंजय चंद्रचूड आगामी दोन वर्षे सरन्यायाधीश म्हणून न्यायदानाचे काम करतील. १० नोव्हेंबर २०२४ रोजी ते या पदावरून निवृत्त होतील. धनंजय चंद्रचूड यांचे वडीलदेखील देशाचे सरन्यायाधीश होते. धनंजय चंद्रचूड हे दिवंगत माजी सरन्यायाधीश वाय व्ही चंद्रचूड यांचे पूत्र आहेत. वाय व्ही चंद्रचूड यांनी सात वर्षे देशाचे सरन्यायाधीश म्हणून न्यायदान केलेले आहे.

देशाचे मावळते सरन्यायाधीश उदय लळित यांचा कार्यकाळ संपल्यानंतर न्यायमूर्ती डी वाय चंद्रचूड यांनी देशाचे ५० वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली आहे. आज (९ ऑक्टोबर) राष्ट्रपतीभवनात हा शपथविधी सोहळा पार पडला. धनंजय चंद्रचूड यांना १३ मे २०१६ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून पदोन्नती मिळाली.




## 'हिंदू' वादावर माफीनाम्यास जारकीहोळी यांचा नकार

### भाजपची टीका, काँग्रेसनेही हात झटकले

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

कर्नाटक प्रदेश काँग्रेस समितीचे कार्याध्यक्ष सतीश जारकीहोळी यांनी 'हिंदू' शब्दाच्या व्युत्पत्तीबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर माफी मागण्यास सपशेल नकार दिला. आपण जे छापले गेले आणि प्रकाशित केले त्या आधारावर बोलल्याचे सांगत आपण विधानावर ठाम असल्याचेही ते म्हणाले. हे वक्तव्य दुर्दैवी असल्याचे सांगत काँग्रेसने हात झटकले, तर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांसह भाजपने काँग्रेसला लक्ष्य केले.

सोमवारी निपाणीमधील एका सभेत 'हिंदू हा शब्द मूळचा फारसी असून त्याची उत्पत्ती इराण-इराक-कझाकस्तान या भागात झाली. याचा मूळ अर्थ अश्लिल



आणि अपमानजनक असून तो इथे सांगू शकत नाही,' असे विधान जारकीहोळी यांनी केले होते. यावर मंगळवारी तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी जारकीहोळीवर जोरदार टीका केली. 'वक्तव्याबद्दल काँग्रेसने माफी मागितली पाहिजे. सर्व स्तरांतून या वक्तव्याचा निषेध झाला पाहिजे. या वक्तव्यानंतर राहुल गांधी व सिद्धरामैयांसह काँग्रेस नेत्यांनी मौन बाळगल्याबद्दल मला आश्चर्य वाटते. जारकीहोळी यांच्या वक्तव्याला त्यांचे समर्थन आहे असा या मौनाचा अर्थ होतो. जारकीहोळी यांचे हे वक्तव्य चुकून झालेले नसून, हेतुपुरस्सर आहे,' असे ते म्हणाले. तर मध्य प्रदेशचे गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांनी जारकीहोळी यांच्या वक्तव्याबद्दल राहुल गांधी यांनी माफी मागावी, अशी मागणी केली. जारकीहोळींचे वक्तव्य दुर्दैवी असल्याचे सांगून, पक्ष त्याच्याशी असहमत असल्याचे काँग्रेसचे कर्नाटक प्रभारी रणदीपसिंग सुरजेवाला यांनी म्हटले आहे.

> **मी काय म्हणालो ते ९० टक्के लोकांनी नीट ऐकले नाही. केवळ हिंदू आणि अश्लिल संदर्भ यावरून अर्थ लावला जात आहे. अशा गोष्टी भूतकाळात अनेकदा घडल्या आहेत.**
> **– सतीश जारकीहोळी, कार्याध्यक्ष, कर्नाटक प्रदेश काँग्रेस**

> **जारकीहोळी यांना हिंदू धर्माविषयी अपूर्ण माहिती असून, सखोल अभ्यास न करता ते असली विधाने करत आहेत. अल्पसंख्याक समाजाची मते मिळवणे हा त्यांचा उद्देश आहे.**
> **– बसवराज बोम्मई, मुख्यमंत्री, कर्नाटक**

> **आम्ही नि:संदिग्धपणे याचा (जारकीहोळींच्या विधानाचा) निषेध करतो. हिंदूत्व ही जीवनशैली आणि नागरी सत्य आहे. प्रत्येक धर्म, धारणा आणि विश्वास यांचा आदर करून काँग्रेसने देशाची उभारणी केली आहे.**
> **– रणदीपसिंग सुरजेवाला, कर्नाटक प्रभारी, काँग्रेस**

# स्वत:शीच लग्न केल्यानंतर अभिनेत्री कनिष्का सोनी दोनच महिन्यात प्रेग्नेंट

टी.व्ही अभिनेत्री कनिष्का सोनी गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चेत होती ते तिनं स्वतःशीच लग्न केल्यामुळे. तिनं सोशल मीडियावर स्वतःचा फोटो शेअर केला होता,ज्यात तिनं भांगात सिंदूर लावलं होतं, गळ्यात मंगळसूत्र घातलं होतं आणि फोटो शेअर करत जाहीर केलं होतं की तिनं स्वतःशीच लग्न केलं आहे. आता तिचे काही फोटो




समोर आले आहेत,ज्यावरनं लोक दावा करत आहेत की ती प्रेग्नेंट आहे. आता यात खरं काय,खोटं काय याविषयी सविस्तर जाणून घेऊयाआठवड्याभरापूर्वी कनिष्का सोनीनं न्यूयॉर्कहून दोन रील पोस्ट केल्या होत्या. त्यामध्ये तिनं पांढरा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची पॅन्ट परिधान केली होती. आता टी-शर्टचा कपडा थोडा हलक्या दर्जाचा असल्या कारणानं तिचं पोट थोडं पुढे आल्यासारखं दिसत होतं. त्यावरनं लोकांनी मात्र ध चा मा केला. त्यांना वाटलं की ती प्रेग्नेंट आहे. ही गोष्ट जेव्हा अभिनेत्रीला कळली तेव्हा तिनं पुन्हा यावर स्पष्टिकरण देत एक पोस्ट केली. कनिष्का सोनीनं इन्स्टाग्रामवर काही फोटो शेअर केले आहेत. ते फोटो त्याच जागेवर तिनं क्लीक केलेत जिथं तिनं आधीचा व्हिडीओ शूट केला होता. तसंच, तिनं तेच कपडे त्या फोटोत घातले आहेत,ज्यात तिचं पोट बाहेर आलेलं दिसत आहे. तिनं लिहिलं आहे की-"मी सेल्फ मॅरिड असले तरी सेल्फ प्रेग्नेंट नाही. हे फक्त अमेरिकेतला चविष्ट पिझ्झा,बर्गर खाल्याकारणानं झालं आहे. यामुळेच माझं वजन थोडं वाढलं आहे. पण मी खूप एन्जॉय करतेय. आणि वजन वाढल्याचं मला दुःख नाही".

# कार्तिकचं एकाच शब्दात उत्तर, चाहते खूश

बॉलीवूड अभिनेता कार्तिक आर्यन हृतिक रोशनची चुलत बहिण पश्मिना रोशनला डेट करतोय अशी चर्चा सध्या सुरू आहे. बोललं जात आहे की सारा अली खानशी ब्रेकअप झाल्यानंतर कार्तिक पुन्हा एकदा प्रेमात पडला आहे. सध्या तो पश्मीना रोशनला डेट करतोय अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. या बातम्यांमध्ये किती सत्यता आहे आणि किती नाही हे येणारा काळ सांगेलच. पण चाहत्यांना कार्तिक आर्यननं सांगून टाकलंय की तो पश्मीना रोशनला डेट करत आहे की नाही. कार्तिक आर्यनच्या चाहत्यांना तेव्हा झटका लागला जेव्हा पश्मीना रोशनसोबतच्या त्याच्या अफेअरच्या बातम्या समोर आल्या. चाहत्यानं कार्तिक आर्यनला टॅग करत एक ट्वीट केलं होतं. चाहत्यानं लिहिलं होतं की,'पश्मीना रोशनला कार्तिक आर्यन डेट करत आहे'. हे वाचून कार्तिकचे सगळेच इतर चाहते मात्र हैराण झाले. कार्तिक पुन्हा कोणासोबत





रिलेशनशीपमध्ये गुंतेल असं मानायला त्याचे चाहते तयार होईनात. सारा अली खानं सोबत ब्रेकअप झाल्यानंतर कार्तिकचं नाव कोणासोबतच जोडलं गेलं नाही,त्यामुळे इतक्या दिवसांनी पश्मीना रोशनसोबत अचानक नाव जोडलं गेल्यानं सगळे हैराण झाले.

चाहत्यांनी कार्तिकच्या पश्मीनासोबतच्या अफेअरविषयी ऐकल्यावर त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार सुरु केला, सगळेच त्याला ही बातमी खरी आहे का असा सवाल करू लागले.त्यावर कार्तिकनं एकाच शब्दात 'नो' म्हणत उत्तर दिलं. पश्मीना रोशन सोबत त्याचं नाव उगाच जोडलं जात आहे असं तो म्हणाला. ते दोघं एकमेकांना डेट करत नाही असं देखील कार्तिकनं नमूद केलं. कार्तिक आर्यनच्या पश्मीना रोशनसोबत डेट करण्यावरील उत्तराचा स्क्रीनशॉट घेत चाहत्यानं ते सोशल मीडियावर शेअर केलं आहे. सोबत कॅप्शनमध्ये लिहिलं आहे की, 'कार्तिककडून कार्तिकी पौर्णिमेला मस्त गिफ्ट मिळालं आहे. आता आम्ही त्याचे चाहते खूप खूश झालो आहोत. कार्तिकने स्वतः स्पष्ट केलं आहे की त्याच्यात आणि पश्मीनामध्ये असं कोणतंच नातं नाही'.

# योगा टिचर ते बाहुबलीची देवसेना असा आहे अनुष्काचा प्रवास

अभिनेत्री अनुष्का शेट्टी हीचा आज ४१ वा वाढदिवस आहे. आज अरबोंची मालकीन असलेली अनुष्का कधीकाळी योगा क्लासेस शिकवून त्यातून मिळणाऱ्या पैशातून घर चालवतं होती.

बाहुबली या दाक्षिणात्य सुपर डुपर हीट सिनेमात देवसेनेची भूमिका करणारी अभिनेत्री अनुष्का शेट्टी हीचा आज ४१ वा वाढदिवस आहे. अनुष्का ही दाक्षिणात्य चित्रपट सृष्टीतला असा मौल्यवान हिरा आहे की ती ज्या चित्रपटात काम करते तो सुपर डुपर होणार याची खात्री असते. पण अनुष्काचा हा यशाचा प्रवासही तेवढाच खडतर आहे. आज अरबोंची मालकीन असलेली अनुष्का कधीकाळी योगा क्लासेस शिकवून त्यातून मिळणाऱ्या पैशातून घर चालवतं होती.


अनुष्काने भरत ठाकुर यांच्याकडून योगाचे शिक्षण घेतले. नंतर ती योगा प्रशिक्षक झाली. याचदरम्यान, दिग्दर्शक मेहर रमेश यांची नजर अनुष्कावर पडली. त्यांनी तिला थेट सिनेमाची ऑफर दिली.

तिने 'सुपर' आणि 'महानदी' या सिनेमात काम केल. पण दोन्ही सिनेमे चालले नाही. त्यानंतर अनुष्का पुन्हा आपल्या गावी जायला निघाली असता दिग्दर्शक एस एस राजामौली यांनी तिला फोन करून बोलवून घेतले. त्यानंतर अनुष्काने कधी मागे वळून बघितले. बाहुबली मधील देवसेनेच्या भूमिकेने देशातच नाही तर परदेशातही अनुष्का लेकप्रिय झाली.

आज अनुष्काची १४० कोटींची मालमत्ता असून हैदराबाद येथील जुबानी हिल्स या महागड्या अपार्टमेंट ६ व्या मजल्यावर तिचा आलिशान फ्लॅट आहे. 'सिंघम', 'रुद्रमहादेवी', 'अरुंधती' आणि 'वेदम' सारखे ब्लॉकबस्टर सिनेमे तिने दिले आहेत.



# रविना टंडनच्या मुलीचा ब्यूटीफुल लूक



बॉलिवूड अभिनेत्री रविना टंडनची मुलगी राशा सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. राशा आता 17 वर्षांची आहे. राशा वारंवार तिचे विविध लूक मधील फोटो शेअर करत असते. राशाचे इंस्टाग्रामवर लाखो चाहते आहेत.

# एकता कपूरच्या 'द क्रू'साठी तब्बू, करीना आणि क्रिती सेनन आले एकत्र!

बॉलिवूड मधील लोकप्रिय अभिनेत्री तब्बू, करीना कपूर खान आणि क्रिती सेनन यांनी त्यांच्या अभिनयाने आणि मनोरंजक चित्रपटांनी प्रेक्षकांचे मन नेहमीच जिंकले आहे. आता पहिल्यांदाच बॉलिवूडच्या या तीन सुंदर 'लीडिंग लेडीज' कॉमिक कॅपर 'द क्रू'साठी पडद्यावर एकत्र दिसणार आहेत. या चित्रपटाची निर्मिती 'वीरे दी वेडिंग'च्या सुपरहिट निर्मात्या जोडी एकता आर कपूर आणि रिया कपूर यांनी केली असून, दर्शकांना ड्रामा आणि कॉमेडीचा डोस देण्यासाठी सज्ज झाले आहेत. संघर्ष करणाऱ्या एअरलाइन उद्योगाच्या पार्श्वभूमीवर आधारित 'द क्रू' एक मजेशीर कॉमेडी असेल. चित्रपटात तीन महिला स्वतःला सिद्ध करण्यासाठी सर्व काही अतूट प्रयत्न करताना पाहायला मिळतील. परंतु, त्यांच्या नशिबी अनोखी परिस्थिती निर्माण



होते आणि ते खोट्याच्या जाळ्यात अडकतात. 'द क्रू'हा चित्रपट चुका आणि विविध घडामोडींच्या विनोदाने भरपूर आहे. निर्माती एकता आर कपूर म्हणाल्या, "वीरे दी वेडिंगच्या यशानंतर, बालाजी मोशन पिक्चर्सला रिया कपूरसोबत आणखी एका चित्रपटासाठी काम करण्यास आनंद झाला आहे. तब्बू, क्रिती आणि करीना 'द क्रू'साठी योग्य असून, हा चित्रपट खूप मनोरंजक आणि विनोदाने भरपूर आहे. ही कथा मोठ्या पडद्यावर आणण्यासाठी मी थांबू शकत नाही."निर्माती रिया कपूर म्हणाल्या, "माझ्या पुढच्या चित्रपटासाठी या तीन सुंदर, प्रतिभावान कलाकारांना आणणे हे एक स्वप्न आहे. मी उत्साहित आणि दृढनिश्चयी आहे आणि चित्रीकरण सुरू होण्याची प्रतीक्षा करू शकत नाही. तसेच, 'वीरे दी वेडिंग'नंतर मी एकतासोबत दुसऱ्यांदा काम करत आहे आणि ती मला सपोर्ट करत आहे हि माझ्यासाठी खूप मोठी बाब आहे."

# ३ वर्षांनंतर पाकिस्तान अंतिम फेरीत

## उपांत्य फेरीत न्यूझीलंडचा सात गडी राखून पराभव

**ॲडलेड । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

न्यूझीलंड विरुद्ध पाकिस्तान संघात टी-२० विश्वचषक २०२२ मधील पहिला उपांत्य फेरीचा सामना खेळला गेला. या सामन्यात पाकिस्तानने बाबर-रिझवानच्या अर्धशतकाच्या जोरावर ७ विकेट्सने विजय मिळवला. त्याचबरोबर टी-२० विश्वचषक २०२२ च्या अंतिम फेरीत पोहचणारा पहिला संघ ठरला. या सामन्यात



न्यूझीलंड प्रथम खेळताना न्यूझीलंड संघान १५३ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात पाकिस्तान संघाने १९.१ षटकांत ३ गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंड डॅरिल मिशेलच्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर, संघाने निर्धारित २० षटकांत २० षटकांत ४ बाद १५२ धावा केल्या होत्या. तसेच पाकिस्तान समोर १५३ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात पाकिस्तान संघाने बाबर-रिझवानच्या अर्धशतकाच्या जोरावर १९.१ षटकांत ३ गडी गमावत १५३ धावा करत हे लक्ष्य पूर्ण केले. पाकिस्तान संघाकडून कर्णधार बाबर आझमने अप्रतिम खेळी करत या विश्वचषकातील पहिले अर्धशतक पूर्ण केले आहे.

# उपांत्य फेरीचा अडथळा पार करण्याचे ध्येय!

## आज भारतापुढे तुल्यबळ इंग्लंडचे आव्हान

**ॲडलेड। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

जेतेपदाच्या स्वप्नपूर्तीपासून केवळ दोन पावले दूर असलेल्या भारतीय संघाला ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी उपांत्य फेरीच्या सामन्यात तुल्यबळ इंग्लंडचा अडथळा पार करावा लागणार आहे. ‘आयसीसी’च्या गेल्या काही स्पर्धांमध्ये भारतीय संघ बाद फेरीच्या सामन्यांत अडखळताना दिसला आहे. मात्र, रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघ हा इतिहास बदलेल अशी भारतीय चाहत्यांना आशा आहे. तसेच पाकिस्तानच्या संघाने अंतिम फेरी गाठल्याने भारताला विजय मिळवण्याची अधिक प्रेरणा मिळाली असेल.



यंदाच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकातील ‘अव्वल १२’ फेरीत इंग्लंडच्या तुलनेत भारताने सरस कामगिरी केली. मात्र, बाद फेरीच्या सामन्याचे दडपण हे पूर्णपणे वेगळे असते. त्यातच भारत आणि इंग्लंड या जागतिक क्रिकेटमधील बलाढ्य संघांमध्ये एकहाती सामने जिंकवून देणाऱ्या खेळाडूंची संख्याही मोठी आहे. त्यामुळे दडपणाखाली, मोक्याच्या क्षणी जे खेळाडू आणि जो संघ सर्वोत्तम कामगिरी करेल, त्यांच्या विजयाची शक्यता अधिक असेल.

**कोहली, सूर्यकुमारवर भिस्त**

यंदाच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकातील ‘अव्वल १२’ फेरीत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या फलंदाजांमध्ये भारताचा विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव हे अव्वल दोन स्थानांवर होते. एकीकडे कोहलीने संयम आणि आक्रमकता यांच्यात उत्तम समतोल साधताना पाच सामन्यांत तीन अर्धशतके साकारली. दुसरीकडे सूर्यकुमारने आपल्या कलात्मक आणि वैविध्यपूर्ण फटक्यांनी सर्वांना थक्क करून सोडले. भारताला कर्णधार रोहित शर्माच्या (पाच सामन्यांत ८९ धावा) कामगिरीची चिंता आहे. नेदरलँड्सविरुद्धचे अर्धशतक वगळता रोहितला धावांसाठी झगडावे लागले आहे. केएल राहुलने गेल्या दोन सामन्यांत अर्धशतके करत सूर गवसल्याची ग्वाही दिली आहे. अखेरच्या षटकांत फटकेबाजीची जबाबदारी हार्दिक पंड्यावर असेल. यष्टीरक्षक म्हणून ऋषभ पंत आणि दिनेश कार्तिक यांच्यात कोणाला पसंती मिळणार हे पाहणेही महत्त्वाचे ठरेल.

**बटलर, स्टोक्सपासून धोका**

कर्णधार जोस बटलर आणि बेन स्टोक्स या इंग्लंडच्या दोन प्रमुख खेळाडूंना या स्पर्धेतील आतापर्यंतच्या सामन्यांत आपली सर्वोत्तम कामगिरी करता आलेली नाही. सलामीवीर बटलरने चार सामन्यांत ११९ धावा केल्या आहेत.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील सामना ॲडलेड ओव्हलवर होणार आहे. हा सामना यापूर्वीच्या दोन सामन्यांदरम्यान वापरण्यात आलेल्या खेळपट्टीवर होणार आहे. त्यामुळे फिरकीपटूंची भूमिका महत्त्वाची असेल. भारताने ‘अव्वल १२’ फेरीत ऑफ-स्पिनर रविचंद्रन अश्विन आणि डावखुरा अक्षर पटेल या दोन फिरकीपटूंसह खेळण्याचा निर्णय घेतला होता. आता उपांत्य फेरीतही हेच दोघे खेळल्यास त्यांच्यावर मोठी जबाबदारी असेल. तसेच अक्षरच्या जागी यजुर्वेंद्र चहलला खेळवण्याचाही भारत विचार करू शकेल. मात्र, त्यामुळे फलंदाजीची बाजू काहीशी कमकुवत होईल. वेगवान गोलंदाजीची धुरा भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी आणि अर्शदीप सिंग सांभाळणे अपेक्षित आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही